# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे


संदर्भ क्र.________________ दिनांक : २९/१०/२०१४

<u>प्रसिध्दीसाठी</u>

# 'बेळगाव'चे 'बेळगावी' करण्याच्या निषेधार्थ 'धर्मराज्य पक्षा'ने केली दादर (पूर्व) येथे संतप्त निदर्शने !

**प्रतिनिधी**

दि. २९ - मराठी **'बेळगाव'**चे कानडी **'बेळगावी'** करण्याच्या, मराठीद्वेष्ट्या कर्नाटक सरकार आणि महाराष्ट्रद्वेष्ट्या केंद्रातील मोदी सरकार यांच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी, बुधवारी, दादर (पूर्व) रेल्वे स्थानकाबाहेर **संतप्त निदर्शने** करण्यात आली.

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाप्रश्नाचा वाद सर्वोच्च न्यायालयात असताना, मराठीद्वेष्ट्या कर्नाटक सरकारच्या दबावापुढे झुकून महाराष्ट्रद्वेष्ट्या केंद्रातील मोदी सरकारने मराठी **'बेळगाव'** जिल्ह्याचे नाव बदलून कानडी **'बेळगावी'** करण्याचा घेतलेला निर्णय हा न्यायालयाचा अपमान आहे. तसेच तमाम मराठी जनतेच्या भावनेचाही हा अवमान आहे, असे मत **'धर्मराज्य पक्षा'**चे अध्यक्ष **राजन राजे** यांनी व्यक्त केले आहे. मराठी **'बेळगाव'** चे कानडी **'बेळगावी'** करण्याच्या निर्णयाविरोधात बुधवारी, दि. २९ ऑक्टोबर-२०१४ रोजी दादर (पूर्व) रेल्वे स्थानकाबाहेर सायंकाळी, ५ ते ७ यावेळेत **'धर्मराज्य पक्षा'**च्या वतीने **संतप्त निदर्शने** करण्यात आली. सीमावासियांवर अन्याय करणाऱ्या कर्नाटक सरकार आणि केंद्रातील मोदी सरकार यांच्या निषेधार्थ जनजागरण मोहिम आखण्यात येणार असल्याची माहिती **'धर्मराज्य पक्षा'**चे महासचिव अनिल ठाणेकर यांनी दिली आहे.

यावेळी मुंबई शहर संपर्कप्रमुख **प्रविण तामसे**, उत्तर-पूर्व मुंबई लोकसभा समितीचे अध्यक्ष **शेखर सावंत**, दक्षिण मुंबई लोकसभा समितीचे अध्यक्ष **ज्ञानेश मुणगेकर** आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

------ ### ------


ए/एर०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००


*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!"...*